RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक २५(६)] मंगळवार, एप्रिल १७, २०१८/चैत्र २७, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ५२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे कार्यालय**

राजभवन, मलबार हिल, मुंबई ४०० ०३५, दिनांक ३० ऑक्टोबर २०१४

**उद्देशिका**

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरबी/टीसी/इ-११०१९(८९)(२०१३)/अधिसूचना-४/११२०/२०१४.—महाराष्ट्राच्या राज्यपालांनी काढलेली पुढील अधिसूचना सर्वसाधारण माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे :—

**ज्याअर्थी,** भारताचे संविधान याच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ५ याच्या उप-परिच्छेद (१) अन्वये, राज्यपालांना, जाहीर अधिसूचनेद्वारे, संसदेचा किंवा राज्याच्या विधानमंडळाचा कोणताही विशिष्ट अधिनियम, भारताचे संविधान याच्या अनुच्छेद २४४ च्या खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुसूचित क्षेत्राला किंवा राज्यातील कोणत्याही भागाला लागू असणार नाही अथवा अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या अपवादांच्या व फेरबदलांच्या अधीन राहून त्या राज्यातील अनुसूचित क्षेत्राला किंवा त्याच्या कोणत्याही भागाला लागू असेल, असा निदेश देता येईल ;

**आणि ज्याअर्थी,** पंचायतींशी संबंधित असलेल्या संविधानाच्या भाग नऊचे उपबंध अनुसूचित क्षेत्राला लागू करण्याच्या आणि त्या अनुसूचित क्षेत्रातील समुचित पंचायतींना व ग्रामसभांना मोठ्या प्रमाणावर स्वयंशासित करण्याच्या हेतूने पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६ (१९९६ चा ४०) अधिनियमित करण्यात आला आहे ;

**आणि, ज्याअर्थी,** पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६ च्या उपबंधानुसार समुचित पंचायती आणि ग्रामसभांना उक्त अधिनियमांत आखून दिलेले अनेक अधिकार देण्यात आले आहेत, याची सुनिश्चिती सर्व राज्य अधिनियमाद्वारे करणे आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अधिनियमाच्या अनुरूप विवक्षित राज्य अधिनियम करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताचे संविधान याच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ५ च्या उप-परिच्छेद (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अधिसूचना करीत आहेत :—

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

भारताचे संविधान याच्या पाचव्या अनुसूचीतील परिच्छेद ५ च्या उप-परिच्छेद (१) द्वारे, प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, बाजार व जत्रा अधिनियम, १८६२ (१८६२ चा मुंबई ४), भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १६), महाराष्ट्र राज्याला लागू असताना, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३), महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ ( १९७४ चा ६) महाराष्ट्र राज्याला लागू असताना, संविधानाच्या अनुच्छेद २४४ च्या खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुसूचित क्षेत्रांना, पुढील अपवाद किंवा फेरबदलांसह लागू होतील, असा निदेश देत आहेत ;

## भाग एक

### बाजार व जत्रा अधिनियम, १८६२ मधील फेरबदल.

बाजार व जत्रा अधिनियम, १८६२ (१८६२ चा मुंबई ४) मध्ये, कलम ४ च्या शेवटी पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

“ परंतु, भारताचे संविधान याच्या अनुच्छेद २४४ मधील खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुसूचित क्षेत्रांमध्ये, नियोजित बाजार किंवा जत्रा यांच्या स्थापनेची परवानगी देणारा असा कोणताही आदेश, समुचित स्तरावरील पंचायतींची आणि ग्रामसभेची पूर्वसूचित संमती घेतल्याशिवाय काढता येणार नाही आणि त्यांनी अशा विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तींवरच तो काढता येईल :

परंतु, आणखी असे की, समुचित स्तरावरील पंचायतींना आणि ग्रामसभेला जिल्हा दंडाधिकाऱ्याकडून प्राप्त झालेल्या अशा संमतीसाठी निर्देशित दिनांकापासून एक महिन्याच्या आत आपला अभिप्राय नोंदविता येईल आणि त्यात कसूर केल्यास, संमती देण्यात आली आहे असे समजण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(एक) “ समुचित स्तरावरील पंचायत ” याचा अर्थ :—

(अ) जर बाजार किंवा जत्रा, दोन किंवा अधिक ग्रामसभांच्या अधिकारक्षेत्रांत येत असतील तर, ग्राम पंचायत,

(ब) जर बाजार किंवा जत्रा, दोन किंवा अधिक ग्राम पंचायतींच्या अधिकारक्षेत्रांत येत असतील तर, पंचायत समिती,

(क) जर बाजार किंवा जत्रा, दोन किंवा अधिक पंचायत समित्यांच्या अधिकारक्षेत्रांत येत असतील तर, जिल्हा परिषद,

असा आहे ;

(दोन) “ ग्रामसभा ” या संज्ञेस, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या प्रकरण तीन अ मध्ये तिला जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल. ”

## भाग दोन

### भारतीय वन अधिनियम, १९२७ मधील फेरबदल

भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १६), महाराष्ट्र राज्यास लागू असताना,—

(एक) प्रकरण तीन नंतर, पुढील प्रकरण समाविष्ट करण्यात येईल :—

## " प्रकरण तीन क

## अनुसूचित क्षेत्रांमधील गौण वनोत्पादनांबाबत

**अनुसूचित क्षेत्रांमधील गौण वनोत्पादनांसाठीच्या तरतुदी.**

**२८क.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, समुचित स्तरावरील पंचायती आणि ग्रामसभा किंवा त्यांची समिती, भारताचे संविधान याच्या अनुच्छेद २४४ मधील खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुसूचित क्षेत्रातील गौण वनोत्पादनांच्या वाहतुकीसंबंधातील वाहतूक परवान्यामध्ये फेरबदल करतील व तो देतील.

(२) अनुसूचित क्षेत्रांतील गौण वनोत्पादने गोळा करण्यासंबंधीचे व त्यांची विक्री करण्यासंबंधीचे आणि सर्व विक्री उत्पन्न विभागून घेण्यासंबंधीचे सर्व निर्णय, समुचित स्तरावरील पंचायतींकडून आणि संबंधित ग्रामसभांकडून घेण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—**प्रकरण तीन क च्या प्रयोजनार्थ,—

(एक) अनूसूचित क्षेत्रातील " गौण वनोत्पादने " या संज्ञेस, महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रांतील गौण वनोत्पादनाच्या मालकीचे हस्तांतरण आणि महाराष्ट्र गौण वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, १९९७ यामध्ये तिला जो अर्थ नेमून दिलेला असेल, तोच अर्थ असेल,

(दोन) " ग्रामसभा " या संज्ञेस, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या प्रकरण तीन अ मध्ये तिला जो अर्थ नेमून दिला असेल, तोच अर्थ असेल. "

## भाग तीन

## महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमामधील फेरबदल.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, (१९५९ चा ३) मध्ये,—

(एक) कलम ५४ (अ) मधील,—

(१) खंड (फ) मध्ये, " (सुधारणा) अधिनियम, १९९७ " या मजकुरानंतर, " आणि भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १६) महाराष्ट्र राज्याला लागू असताना याचे प्रकरण तीन क, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

(२) खंड (ज) मध्ये, " निर्णयास मान्यता देणे " या मजकुरानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल,:—

" आणि त्याच्या अधिकारक्षेत्रातील लघु जलसंचयातील मासेमारीचे देखील व्यवस्थापन करणे " ;

(३) खंड (न) मध्ये,—

(एक) " पंचायत समिती व जिल्हा परिषद " या मजकुरानंतर " आणि सामाजिक क्षेत्रातील कार्यक्रम, प्रकल्प, आणि योजनांच्या अंमलबजावणीशी संबंधित इतर विभाग " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) स्पष्टीकरणातील, " सामाजिक क्षेत्र " या संज्ञेमधील " या अधिनियमाच्या कलम ४५ " या मजकुरानंतर, " आणि तशाच योजना, कार्यक्रम आणि प्रकल्प राबविणारा राज्य शासनाचा कोणताही विभाग " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) कलम ५४ब मधील,—

(१) खंड (ह) मध्ये, " व्यवस्थापन करण्यास " या मजकुरानंतर, " आणि त्याच्या अधिकारक्षेत्रातील लघु जलसंचयांतील मासेमारीचे देखील व्यवस्थापन करण्यास " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(२) खंड (न) नंतर पुढील प्रमाणे नवीन खंड (ओ) समाविष्ट करण्यात येईल :—

" (ओ) जनजाति उपयोजनांसह स्थानिक योजना आणि अशा योजनांच्या साधनसंपत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सक्षम असेल :

परंतु, त्या त्या वार्षिक योजनेच्या एकूण जनजाति उप-योजना निधीच्या ५ टक्क्यापेक्षा कमी नसेल इतका निधी, अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात देण्यात येईल :

परंतु, आणखी असे की, पंचायत, ग्रामसभेकडून शिफारस करण्यात येईल त्या प्रयोजनासाठी आणि त्या मर्यादेत या निधीचा वापर करील :

परंतु, तसेच एखाद्या पंचायतीत एका पेक्षा अधिक ग्रामसभा असतील तर, हा निधी संबंधित ग्रामसभेच्या लोकसंख्येच्या प्रमाणात वापरण्यात येईल. "

## भाग चार

### महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील फेरबदल

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) याच्या कलम ४८ मध्ये पोट-कलम (९) नंतर पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल,:—

" (१०) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, भारताचे संविधान याच्या अनुच्छेद २४४ च्या खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुसूचित क्षेत्रांमध्ये, लिलावाद्वारे, गौण खनिजांसाठी पूर्वेक्षण अनुज्ञप्ती किंवा खाणकाम भाडेपट्ट्यास मंजुरी देण्यापूर्वी आणि गौण खनिजांचे समुपयोजन याबाबतची सवलत देण्यापूर्वी, ग्रामसभेची किंवा समुचित स्तरावरील पंचायतींची संमती अनिवार्य असेल.

**स्पष्टीकरण.—**या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, " ग्रामसभा " याचा संज्ञेस, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या प्रकरण तीन अ मध्ये तिला जो अर्थ नेमून दिलेला आहे, तोच अर्थ असेल. "

## भाग पाच

### जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ मधील फेरबदल

जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ (१९७४ चा ६) महाराष्ट्र राज्याला लागू असताना,—

(एक) कलम २ मध्ये, खंड (ग) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल,:—

" (ग ग) अनुसूचित क्षेत्रातील " लघु जलसंचय " या संज्ञेस, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम ५४ब(ह) च्या स्पष्टीकरणात त्याला जो अर्थ नेमून दिला आहे तोच अर्थ असेल ; "

(दोन) कलम २ मध्ये, खंड (च) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (च च) " अनुसूचित क्षेत्रे " याचा अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद २४४ च्या खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेली क्षेत्रे, असा आहे ; "

(तीन) कलम २५ मधील, पोट-कलम (३) मध्ये पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु असे की, कोणत्याही व्यक्तीने ग्रामपंचायतीची पूर्वसूचित संमती घेतल्याखेरीज राज्य मंडळ, अनुसूचित क्षेत्रांतील लघु जलसंचयाच्या संदर्भातील पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली आपली संमती देणार नाही. "

(चार) कलम ३० नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल, :—

**अनुसूचित क्षेत्रात सुधारात्मक उपाययोजना करण्याचा राज्य मंडळाचा अधिकार.**

" **३०क.** जर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेने, तिच्या अधिकारक्षेत्रात असलेल्या अनुसूचित क्षेत्रांतील लघु जलसंचयात प्रदूषण असल्याचा ठराव राज्य मंडळास पाठविल्यास, मंडळास असा ठराव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून लवकरात लवकर, आणि कोणत्याही परिस्थितीत, एक महिन्याच्या आत अधिनियमान्वये आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमान्वये तपास करून, आवश्यक ती सुधारात्मक कारवाई करणे अत्यावश्यक असेल. "

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**परिमल सिंह,**
राज्यपाल यांचे उप सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.